**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**
**जनसंपर्क विभाग**

---

## महानुभाव साहित्यामध्ये क्रांती घडविण्याची ताकद - कुलगुरु
## महानुभाव साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन संपन्न

अमरावती.

साहित्याच्या प्रभावानुसार देश व संस्कृती घडत असते. महानुभाव साहित्यामध्ये ती क्रांती घडविण्याची ताकद असल्याचे प्रतिपादन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी केले. विद्यापीठाचा महानुभाव पंथ केंद्र आणि विद्याभारती महाविद्यालयाचा मराठी विभाग यांचे संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या दृकश्राव्य सभागृहात आयोजित महानुभाव साहित्य संमेलनाचे उद्‌घाटनप्रसंगी उद्‌घाटकीय भाषण करतांना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संमेलनाध्यक्षपदी अमरावतीचे महानुभाव साहित्य संशोधक व लेखक पुरुषोत्तम कारंजेकर उपाख्य प्रा. पुरुषोत्तम नागपुरे, अतिथी म्हणून वैद्यराजबाबा वाठोरेकर, रिद्धपूरचे महंत श्रीतळेगावकरबाबा, स्वागताध्यक्ष कुलसचिव डॉ. अजय देशमुख, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता तथा विद्याभारती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एफ.सी. रघुवंशी, महानुभाव साहित्य संमेलनाचे संयोजक डॉ. सतीश तराळ, महानुभाव पंथ केंद्राचे समन्वयक डॉ. राजेंद्र सोनपेठकर, विद्याभारतीचे मराठी विभागप्रमुख प्रा. गजानन बनसोड उपस्थित होते.

साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन झाल्याची घोषणा सर्वप्रथम कुलगुरुंनी केली. पुढे म्हणाले, सर्वज्ञ चक्रधर स्वामींनी त्याकाळी ज्ञानदानाचे कार्य केले, त्यातून साहित्याची निर्मिती झाली. स्वामींनी मराठी भाषेला लोकभाषेचा, धर्मभाषेचा दर्जा दिला. त्याकाळी समाजामध्ये कुप्रथा, वाईट चालिरिती होत्या, त्यावर स्वामींनी प्रहार करुन मानवी जीवन आनंदीमय करण्यासाठी नवीन आचारसंहिता आणली. महाराष्ट्राला संत ज्ञानेश्वरांपासून तुकोबा, तुकडोजी महाराज, गाडगे बाबांसह अनेक संतांच्या साहित्याचा वारसा लाभला आहे. वैभवशाली संस्कृती आपल्याला मिळाली आहे. जगाचे नेतृत्व करण्याची सुद्धा ताकद त्यामध्ये आहे. महानुभाव सहित्य समाजाला दिशादर्शक राहीले आहे. पण ते साहित्य समाजात पाहिजे, त्या प्रमाणात रुजलं नाही. त्याचे कारण म्हणजे मोघलाच्या काळात त्याला बंदिस्त करण्याचा प्रयत्न झाला. महानुभाव साहित्य सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी वाटेकरी होण्याची विद्यापीठाला संधी मिळाल्याबद्दल त्यांनी धन्यता व्यक्त केली.

संमेलनाध्यक्ष प्रा. पुरुषोत्तम नागपुरे म्हणाले, विश्वविद्यालय स्तरावरील पहिले संमेलन विद्यापीठाने आयोजित करण्याची संधी दिली असून महानुभाव पंथीय साहित्याचा प्रसार करण्याचे विद्यापीठाच्या अनुषंगाने एक चांगले माध्यम प्राप्त झाले आहे. त्यामुळे महानुभाव साहित्याचा प्रसार सर्वसामान्यांपर्यंत होण्यास मदत होईल. पुढे म्हणाले, लीळाचरित्रासारखा गद्द स्वरुपातील ग्रंथ आजवर कोणीच लिहीलेला नाही. त्यातील साहित्यीक मूल्ये जगण्याचा मंत्र देतात. चक्रधर स्वामींनी सूत्र स्वरुपात दिलेल्या मंत्रातून मानवाला एक नवी दिशा प्राप्त होते. आरोग्यदायी जीवनशैली जगता यावी, यासाठी योगी, विषया आणि भक्ती या गोष्टी महत्वाच्या आहेत. साहित्य निर्मिती होत असतांना विकार व विकल्प शून्य होवून साहित्य लिहिल्या गेले पाहिजे, तशा

साहित्यातून चैतन्य प्राप्त होते. महानुभाव साहित्य सर्वांपर्यंत पोहोचवण्याची गरज आहे. अडीच हजाराहून पोत्या रिद्धपूरला आहेत, त्या पोत्यातील साहित्यांवर उद्योन्मुख संशोधकांनी पुढे येवून संशोधन केल्यास सर्वसामान्यांपर्यंत ते साहित्य, त्यातील विचार आणि मूल्ये पोहचू शकतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सुरुवातीला चक्रधर स्वामीजींच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण, दीपप्रज्वलन, पोत्यांचे पूजन करण्यात आले. स्वागतगीताने तसेच स्मृतिचिन्ह व हार घालून पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी, स्वागतपर मनोगत प्राचार्य डॉ.एफ.सी. रघुवंशी यांनी, संमेलन आयोजनामागील भूमिका संयोजक डॉ. सतीश तराळ यांनी विषद केली. यावेळी स्मरणिकेचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. सतीश तराळ लिखीत ‘प्रबोधन मैतिके’ व डॉ. प्रमोद गारोडे लिखीत ‘चाक : आस्वाद आणि आकलन’ ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी निवड झाल्याबद्दल कुलगुरुंचे हस्ते प्राचार्य डॉ.एफ.सी. रघुवंशी यांचा शॉल, श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन श्री संदीप जुनघरे यांनी, तर आभार डॉ. गजानन बनसोड यांनी मानले. सकाळी ८.०० वाजता विद्यापीठ मुख्य प्रशासकीय इमारतीपासून साहित्य दिंडीला सुवात होवून विद्याभारती महाविद्यालयात दिंडीची सांगता झाली.

उद्‌घाटन कार्यक्रमाला सिनेट सदस्य श्री अमोल ठाकरे, डॉ. मिनल ठाकरे (भोंडे), श्री सुभाष पावडे, डॉ. अरुण चव्हाण, प्रा. यादगिरे, डॉ. मनोज तायडे, डॉ. मोना चिमोटे, डॉ. हेमंत खडके, डॉ. अलका गायकवाड, म. मोहनराजदादा अमृते, तपस्विनी अलकाताई कारंजेकर, प्रा. संदीप तडस, डॉ. स्मिता ठाकरे, प्रा. सारिका पाचराऊत, डॉ. राज यावलीकर, श्री विष्णू सोळंके, डॉ. रेषा आकोटकर, डॉ. शोभा रोकडे, निलिमा भोजने, डॉ. गिरीष खारकर, श्री अनिल पाटील, श्री राजेश महल्ले, प्रा. राजु शिंदे, डॉ. योगिता पिंजरकर, डॉ. रणजीत गणोदे, अतुल ठाकरे, प्रा. वनिता पोकळे, छाया पाथरे, सारिका निंभोरकर, डॉ. वर्षा चिखले, डॉ. सुशिला धाबेकर, डॉ. कमलताई भोंडे, डॉ. प्रमोद गोरडे, श्रीमती विद्यालक्ष्मी मेटकर, यांचेसह महानुभाव पंथ अनुयायी, शिक्षक, नागरिक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## **दुपारचे सत्र**

दुसऱ्या सत्रात सातीकाव्यग्रंथातील आशय व अविष्कार या विषयावर परिसंवाद झाला असून अध्यक्षस्थान डॉ. अशोक राऊत यांनी भूषविले. सूत्रसंचालन सौ. नम्रता पावडे यांनी केले. कविसंमेलनाच्या तिसऱ्या सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. सुखदेव ढाणके यांनी भूषविले. सूत्रसंचालन डॉ. मंदा नांदुरकर यांनी केले.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २१/०४/२०१८.

दै............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी